**रेगुंठा उपसा सिंचन योजना ता.सिरोंचा, जि. गडचिरोली योजनेस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.**

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर**

**महामंडळ निर्णय क्रमांक: १३२ /विपाविम/कातां -६(२)/(धा.क्र. रेगुंठा उसिंयो) / प्रथम सुप्रमा / २०२३, दि.१४/०८/२०२३**

**संदर्भ** :- १. महामंडळाचे निर्णय क्र. विपाविमं/ कातां-६/ ४२२१/ रेगुंठा उसिंयो /प्रमा/ (११/२००७)/२००८ दि.१६.०९.२००८

२. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि.०९.०९.२०१५.

३. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांचे पत्र. क्र. रातांसस(१)/कक्ष-१/ अंवप्रकिं/ (धा.क्र.५४/२०२०) ५७३/२०२१ दि.०४/०८/२०२१.

४. अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि.०८/०४/२०२२ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक-२०२२/(६५/२०२२)/लपा, दि. २७/०४/२०२२

५. विपाविम नियामक मंडळाचे दि. १९/०६/२०२३ चे ८३ व्या बैठकीतील ठराव क्र. ८३/०२

**प्रस्तावना** :

रेगुंठा उपसा सिंचन योजना ही विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळांतर्गत नक्षलप्रवण, अतिदुर्गम व आदिवासी क्षेत्रातील असून गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यातील रेगुंठा (मौजा चंदाराम माल) या गावाजवळील प्राणहिता नदीच्या डाव्या तिरावर बांधकामाधीन आहे. या प्रकल्पाद्वारे गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यातील १७ गावातील २०५२ हे. क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

रेगुंठा उपसा सिंचन योजनेस, महामंडळाचे निर्णय क्र.विपाविमं/ कातां-६/ ४२२१/ रेगुंठा उसिंयो /प्रमा/ (११/२००७)/२००८ दि.१६.०९.२००८ नुसार सन २००७-२००८ चे दरसुचीवर आधारीत रू. ३५००.१३३ लक्ष (रू. पस्तीस कोटी तेरा हजार तीनशे फक्त) इतक्या रकमेस मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ, जादा दराची निविदा स्विकृतीमुळे वाढ, भुसंपादन खर्चातील वाढ, संकल्पनातील बदल, अपु-या तरतुदी, इतर कारणे व अनुषंगीक खर्च इत्यादी कारणामुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत मुळ प्रशासकीय मान्यता किंमतीच्या १७७.६० टक्क्याने वाढत असल्यामुळे प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

रेगुंठा उपसा सिंचन योजनाचा प्रथम सुप्रमा बाबतचा छाननी अहवाल राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती(१), नाशिक, यांचे दि. १८.०२.२०२१ रोजीच्या १५६ व्या बैठकीत

अंतिम करण्यात आला असून पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र. ३ नुसार प्राप्त झालेला आहे.

रेगुंठा उपसा सिंचन योजनेच्या प्रथम सुप्रमा प्रस्तावावर अतिरीक्त मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, यांचे अध्यक्षतेखाली दि. ०८.०४.२०२२ रोजी झालेल्या मा. सचिव उपसमितीचे बैठकीत चर्चा होवून राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या तपासणीतील मुद्दा क्र. २७ ची पुर्तता करण्याच्या तसेच प्रकल्पाची सर्व कामे राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने विहीत केलेल्या कालावधीत पुर्ण करणेच्या अटीच्या अधीन राहून प्रस्ताव नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली आहे.(संदर्भ-४)

संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

दि. १९.०६.२०२३ रोजी झालेल्या नियामक मंडळाचे ८३ व्या बैठकीतील ठराव क्र. ८३/०२ नुसार रेगुंठा उपसा सिंचन योजनेच्या रू. ९७.१६ कोटी अंदाजित किंमतीच्या प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या तपासणी अहवालातील मुद्दा क्र. २७ ची पुर्तता करण्याच्या तसेच प्रकल्पाची सर्व कामे राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने विहीत केलेल्या कालावधीत पुर्ण करणेच्या अटीच्या अधीन राहून तसेच सचिव उपसमितीच्या दि. ०८/०४/२०२२ च्या बैठकीमध्ये उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अटीचे अधीन राहून मान्यता दिली असून या बाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करण्याकरिता नियामक मंडळाने सर्वानुमते मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता किंमत रू. ३५००.१३३ लक्ष च्या तुलनेत प्रथम सुधारित प्रकल्प अहवालाची किंमत रू. ६२१६.०० लक्षाने जास्त आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेतः-

| अ.क्र. | बाब | वाढ (रू कोटी) | मंजूर प्रमा किंमतीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी | एकूण वाढीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | दरसूचीतील बदलामुळे | १०.३९ | २९.६९ | १६.७२ |
| २ | जास्त दराची निविदा स्विकृतीमुळे | ०.८९ | २.५४ | १.४३ |
| ३ | भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ | -०.११ | -०.३१ | -.०.१७ |
| ४ | इतर कारणामुळे झालेली वाढ | ३२.१० | ९१.७१ | ५१.६४ |
| ५ | संकल्पचित्रातील बदलामुळे झालेली वाढ | ४.१३ | ११.८० | ६.६४ |
| ६ | अपुऱ्या तरतुदीमुळे झालेली वाढ | ८.६० | २४.५७ | १३.८३ |
| ७ | अनुषंगिक खर्च | ६.१६ | १७.६० | ९.९१ |
| | **एकूण** | **६२.१६** | **१७७.६०** | **१००** |

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय** :

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये गडचिरोली जिल्ह्यातील रेगुंठा उपसा सिंचन योजना, ता. सिरोंचा, जि. गडचिरोली या योजनेच्या रू. ९७१६.०० लक्ष (रू.सत्यानव कोटी, सोळा लक्ष फक्त) ईतक्या किंमतीस खालील अटींचे अधीन राहून प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यापैकी रू. ८७६७.०० लक्ष (रू. सत्यांशी कोटी सदुसष्ठ लक्ष फक्त) कामाप्रित्यर्थ व रू. ९४९.०० लक्ष (रू. नऊ कोटी एकोण पन्नास लक्ष फक्त) अनुषंगीक खर्च समाविष्ट आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामांसाठी जलसंपदा विभागाची व सार्वजनिक बांधकाम विभागाची सन २०१८-१९ या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत.

प्रकल्पाच्या उपशिर्षवार किंमतीचा गोषवारा सोबतच्या परिशिष्टामध्ये संलग्नित आहे .

१. ठळक बाबी –

| | | |
|---|---|---|
| अ) | योजनेचे सिंचन क्षेत्र | २०५२ हेक्टर |
| ब) | योजनेचा एकुण पाणीवापर | २५.४४ दलघमी |
| क) | योजनेची प्रति स.घ.मी.पाणीसाठा किंमत | (लागू नाही) |
| ड) | योजनेचे लाभव्यय गुणोत्तर | १.८१ (मापदंड १.५ पेक्षा जास्त) |
| इ) | आर्थिक परतावा दर | ११.९६ (मापदंडात बसत नाही) |

२. या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र.आय -५, मुख्य लेखाशिर्ष "४७०१", मध्यम पाटबंधारे प्रकल्प यावरील भांडवली खर्च, (८०)- सर्वसाधारण, (१९०)- सार्वजनिक व इतर उपक्रमातील गुंतवणुका (शासन अंशदान), (मध्यम प्रकल्प), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (४७०१ H-६६५) या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. या योजनेस प्रदान केलेली प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता (१४/२०२३) या अनुक्रमांकावर नोंदविण्यात आली आहे.

४. सदर प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

४.१) सदर सुधारीत प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वयीन करण्याच्या विविध टप्प्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहीत धरता येणार नाही.

४.२) सुधारीत प्रशासकीय मान्यता म्हणजे अहवालातील तांत्रिक बाबी अथवा निविदा विषयक क्षेत्रिय स्तरावरील निर्णयास किंवा झालेल्या क्षेत्रिय अनियमीततेस मान्यता गृहीत धरली जाणार नाही.